दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक ३१५ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.९ फेब्रुवारी २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## चाकूचा धाक दाखवून टेंपो चालकाला लुटले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

चाकूचा धाक दाखवून एका टेंपो चालकाला पावणे सहा लाखांना लुटल्याची घटना पनवेल जवळील कर्नाळा घाटाच्या उतारावर घडली आहे.

जैसराज यादव (वय-२४) हा त्याच्या ताब्यातील टेंपो घेऊन कामोठे ते माण-गाव असा प्रवास करीत असताना कर्नाळा घाटाच्या उतारावर पळस्पे-पेण मार्गावर त्याच्या टेंपोमागून येणाऱ्या दोन अनोळखी मोटारसायकलस्वारांच्या इसमांनी टेंपोला अडवून त्याला चाकूचा धाक दाखवून त्याच्या टेंपो केबिनमध्ये ड्रायव्हर सीट खाली ठेवलेली ५ लाख ७५ हजारांची रोखरक्कम, मोबाईल व टेंपोची चावी असा एकूण ५, ७६, ६०० रुपयांचा माल जबरीने चोरून ते पळून गेल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

# मुरुडच्या ग्रामीण रुग्णालयात मद्यधुंद रुग्णाचा धिंगाणा



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

**मुरुडच्या ग्रामीण रुग्णालयात मद्यधुंद अवस्थेत आलेल्या रुग्णास डॉक्टरांनी चिठ्ठी देऊन अलिबाग जिल्हा रुग्णालयात जाण्याचा सल्ला दिला असता त्याने चक्क रुग्णालयाची तोडफोड केली. याबाबत वैद्यकीय अधिकारी डॉ.विजय हाडबे यांनी रुग्ण मंगेश जगताप याच्या विरोधात पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असल्याचे समजते.**

दि ०७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वा दारूच्या व्यसनाधीन झालेला रुग्ण डॉक्टरांनी एडमिट करून घेतला. रात्री ८.३० वा तो मानसिकरित्या पूर्णतः शुद्धीत नसल्याने त्याला अलिबाग येथे जाण्यास संदर्भ चिठ्ठी देऊन जाण्यास सांगितले. परंतु तो जाण्यास अजिबात तयार नव्हता, अशावेळी रुग्णालयामध्ये एकही सुरक्षा रक्षक नाही त्यामुळे त्याला कोणी बाहेर काढू शकले नाही. तो रात्री रुग्णालयाच्या आवारात गोंधळ घालत राहिला. मध्यरात्री २.३० ला दि ८/०२ त्याने लोखंडी रॉड च्या साहाय्याने सामान्य वॉर्ड, प्रयोग शाळा, तातडीचा विभाग व प्रसूती रूम मधील सर्व दवाज्यांच्या आणि खिडक्यांच्या काचा फोडल्या, प्रयोग शाळेतील कपाट, फ्रीज, तसेच इतर साहित्य तोडफोड केली, बाहेर ठेवलेले पाण्याचे कूलर तोडले, प्रसूती रूम मधील सर्व साहित्यांची तोडफोड केली आणि लोखंडी रॉड घेऊन रुग्णालयात ड्युटी वर असलेल्या महिला कर्मचायांच्या अंगावर धाव घेतली, तो ही तोडफोड सुमारे १ तास करत राहिला पण रुग्णालयात काम करणाऱ्या बहुतांश महिला कर्मचारी असल्याने त्याला कोणीच अडवू शकले नाही.

सुरक्षा रक्षकांच्या अभावामुळे मागच्या ३ महिन्याच्या काळात रुग्णालयाला पाणी पुरवठा करणारी मोटार सुद्धा २ वेळा चोरीला गेली. बहुतांश कर्मचारी या महिला आहेत. रात्री बेरात्री महिला रुग्णालयात काम करताना संपूर्ण असुरक्षितता असून याठिकाणी सुरक्षा रक्षक असणे गरजेचे आहे.असे वैद्यकीय अधिकारी डॉ.विजय हडबे यांनी सांगितले.

### श्रीवर्धन तालुक्यात महावितरणकडून ग्राहकांची दिशाभूल

## देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी महिन्यातून चार वेळा वीजपुरवठा दिवसभर खंडित

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन तालुक्यात महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून ग्राहकांची दिशाभूल सुरू असून देखभाल व दुरुस्तीच्या नावाखाली महिन्यातून तीन ते चार वेळा संपूर्ण दिवसभर वीजपुरवठा खंडित करण्याचा प्रकार सुरू आहे. श्रीवर्धन तालुका हा पर्यटकांच्या दृष्टीने महाराष्ट्रातील एक नंबर पसंतीचे ठिकाण आहे. या ठिकाणी नेहमीच पर्यटक मोठ्या प्रमाणावर येत असतात. परंतु वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर या ठिकाणी आलेले पर्यटक नाराज होतात.

वीज पुरवठा वारंवार खंडित होत असल्यामुळे हॉटेल किंवा रिसॉर्ट मालकांना जनरेटरचा आधार घ्यावा लागतो. त्यामुळे हॉटेल मालकांचे मोठ्या प्रमाणावरती नुकसान होते. देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी वारंवार वीजपुरवठा खंडित करणाऱ्या महावितरणकडून एरवीही अनेक वेळा अचानक झालेल्या बिघाडामुळे दुरूस्तीसाठी वीज पुरवठा खंडित करण्यात येतो. परंतु वीज बिल भरणा



करण्यासाठी एक दिवस उशीर झाला तरीही महावितरणचे कर्मचारी वीज पुरवठा कापण्यासाठी हजर होतात. यापूर्वी महावितरणकडून देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी तीन ते चार महिन्यातून एक दिवस वीज पुरवठा खंडित केला जात असे. किंवा कांदळगाव येथील वीज केंद्र मधील जनरेटर मधील इंधन बदलण्यासाठी वीजपुरवठा खंडित केला जात असे. परंतु पावसाळ्यानंतर आज पर्यंत महिन्यातून तीन ते चार वेळा दुरुस्ती व देखभालीच्या नावाखाली संपूर्ण दिवसभर वीजपुरवठा खंडित करण्यात येतो व संध्याकाळी सात वाजता वीजपुरवठा सुरू होईल असे सांगितले असले तरी प्रत्यक्षात वीज पुरवठा सुरळीत होण्यास आठ ते नऊ वाजतात. अशाप्रकारे महावितरणकडून दुरुस्ती व देखभालीच्या नावाखाली वीजपुरवठा खंडित करणे म्हणजेच अघोषित भारनियमन सुरू असल्याचे नागरिकांचे व वीज ग्राहकांचे म्हणणे आहे.

संपूर्ण दिवसभर वीज पुरवठा खंडित करून सदरचा वीज पुरवठा औद्योगिक वसाहतीमध्ये कार्यान्वित करण्यात येत असल्याचे देखील बोलले जात आहे. पुढील महिन्यात उन्हाळा सुरू होत आहे तसेच सुट्ट्या लागल्या नंतर श्रीवर्धन तालुक्यात पर्यटक देखील मोठ्या प्रमाणावर येणार आहेत. तरी महावितरणने वारंवार दुरुस्ती व देखभालीच्या नावाखा-ली वीज पुरवठा खंडित करू नये. अशी मागणी तालुक्यांमधील वीज ग्राहकांकडून व नागरिकांकडून केली जात आहे. महावितरणने आपल्या या धोरणामध्ये बदल केला नाही तर महावितरणच्या विरोधात आंदोलन छेडण्याची तयारी देखील नागरिकांमधून सुरू आहे.

## कर्जत रेल्वे स्थानक प्रशासनाचा हलगर्जीपणा, प्रवाशांच्या जीवास धोका

**दै.रायगड नगरी । संजय गायकवाड**

**कर्जत** : कर्जत रेल्वे स्थानक प्रशासनातील उद्घोषणा विभागाच्या ढिसाळ कारभारामुळे अनेकदा रेल्वे प्रवाशांना शारीरिक व मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत असते. वारंवार तक्रार करुन देखील उद्घोषणा विभागाच्या कामकाजात काहीही सुधारणा होताना दिसुन येत नाही. उद्घोषणा विभागाच्या बेजबाबदारपणामुळे भविष्यात एखाद्या रेल्वे प्रवाशाचा मृत्यु होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रवासी मृत झाल्यावरच उद्घोषणा विभागा सुधारेल का? अशी चर्चा रेल्वे प्रवाशांमध्ये होत आहे.



आज सकाळी कर्जत रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक दोन व तीनवर मालगाड्या उभ्या होत्या. खोप-ोली वरुन मुंबई दिशेकडे जाणारी ९.०६ वाजताची लोकल नेहमी फलाट क्रमांक तीनवर येत असल्यामुळे सर्व रेल्वे प्रवाशी फलाट क्रमांक दोन व तीनवर लोकलची वाट पहात उभे होते. खोपोली वरुन येणा-या मुंबई लोकलची वेळ होऊन गेली तरी मालगाड्या फलाटांवरच उभ्या होत्या आणि कर्जत रेल्वे स्थानकातील उद्घ-ोषणा विभागाकडुन कोणत्याही प्रकारची उद्घोषणा होत नव्हती. त्यानंतर थोड्याच वेळात खोपोली वरुन मुंबई दिशेकडे येणारी लोकल आली आणि त्यानंतर म्हणजेच ९ वाजुन ११ मिनिटांनी कर्जत रेल्वे स्थानकातील उद्घोषणा विभागाला जाग आल्यावर त्यांनी उद्घोषणा केली की, खोपोली वरुन मुंबई दिशेकडे जाण-ारी लोकल फलाट क्रमांक एकवर येणार आहे. त्यामुळे फलाट क्रमांक दोन व तीनवर उभ्या असलेल्या रेल्वे प्रवाशांची खुपच धावपळ उडाली.

फलाटाच्या शेवटच्या टोकाला असणा-या पादचारी पुलापर्यंत धावत पळत जाऊन पुन्हा फलाट क्रमांक एकवर प्रवाशांना यावं लागल्यामुळे सर्वच प्रवाशांची खुपचं दमछाक झाली. तसेच काही लहान मुलांसह प्रवास करणारे कुटुंब व वयोवृद्ध प्रवाशांनी ह्या लोकलने प्रवास करण्याचे टाळले. अशा प्रकारे केवळ एक दोन मिनिटे अगोदर उद्घोषणा करणा-या कर्जत रेल्वे स्थानकातील उद्घोषणा विभागाच्या

.../२

## संक्षिप्त...

### राज्यातील सक्रिय रुग्णसंख्या लाखाच्या खाली

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात आज करोनाच्या दैनंदिन रुग्णसंख्येत गेल्या काही दिवसांपासून दररोज मोठी घट होताना दिसत आहे. तसेच मृत्यूसंख्याही कमी झाल्याने राज्याला मोठा दिलासा मिळत आहे. आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात गेल्या २४ तासात ६ हजार १०७ नव्या रुग्णांचे निदान झाले आहे. तर, आज राज्यात एकूण ५७ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. तर दिवसभरात १६ हजार ०३५ करोना बाधित रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत. या बरोबरच राज्यात आज एकूण ९६ हजार ०६९ रुग्णांवर (सक्रिय रुग्ण) उपचार सुरू आहेत.

राज्यात आजपर्यंत एकूण ७५ लाख ७३ हजार ०६९ करोना बाधित रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत. यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९६.८९ टक्के झाले आहे. आजपर्यंत तपासण्यात आलेल्या ७ कोटी ५७ लाख ६८ हजार ६३४ प्रयोगशाळा नमुन्यांपैकी ७८ लाख १६ हजार २४३ नमुने पॉझिटिव्ह आले आहेत. हे प्रमाण १०.३२ टक्के इतके आहे. सध्या राज्यात ६ लाख ३९ हजार ४९० व्यक्ती होम क्वारंटाइनमध्ये आहेत, तर २ हजार ४१२ व्यक्ती संस्थात्मक क्वारंटाइनमध्ये आहेत. याबरोबरच, राज्यात आतापर्यंत मृत्युमुखी पडलेल्या रुग्णांची संख्या १ लाख ४३ हजार १५५ इतकी आहे.

## रायगड जिल्ह्यातील दरड कोसळलेल्या गावांच्या कायम पुनर्वसनाकरिता निधी मंजूर : ना.विजय वडेट्टीवार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

जुलै २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे दरड कोसळल्याने बाधित झालेल्या रायगड जिल्ह्यातील गावांच्या कायमस्वरूपी पुनर्वसनाकरिता १३ कोटी २५ लाख रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी दिली.

मदत व पुनर्वसन मंत्री श्री.वडेट्टीवार म्हणाले, दि. २२ व २३ जुलै, २०२१ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील मौजे तळीये, कोंडाळकरवाडी व बौध्दवाडी,मौजे केवनाळे व पोलादपूर तालुक्यातील मौजे साखर (सुतारवाडी) ही गावे बाधीत झाली होती तसेच मनुष्यहानी देखील झाली होती. दरड कोसळून बाधित झालेल्या नागरिकांचे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याच अनुषंगाने या गावांच्या कायमस्वरुपी पुनर्वसनाकरिता भुसंपादन तसेच नागरी व सार्वजनिक सोयी सुविधा, विद्युत पुरवठा तसेच जल जीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा करणे या कामांकरिता १३ कोटी २५ लाख रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

त्याअंतर्गत महाड तालुक्यातील मौजे तळीये, कोंडाळकरवाडी व बौध्दवाडी मध्ये भुसंपादन करण्यासाठी २ कोटी ९२ लाख १७ हजार ७६१ रूपये, मौजे केवनाळे मध्ये भुसंपादन करण्यासाठी ६४ लाख २६ हजार १४८ रूपये, पोलादपूर तालुक्यातील मौजे साखर (सुतारवाडी) साठी ३८ लाख ४१ हजार ७८६ रूपये असे एकूण भुसंपादनासाठी ३ कोटी ९४ लाख ८५ हजार ६९५ रूपये तर महाड तालुक्यातील मौजे तळीये तर कोंडाळकरवाडी व बौध्दवाडी मध्ये नागरी व सार्वजनिक सोयी सुविधा, विद्युत पुरवठा तसेच जल जीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा करणे या कामांकरीता ९ कोटी ३० लाख १६ हजार ५५२ रूपये निधीची तरतूद करण्यात आली आहे असे एकूण १३ कोटी २५ लाख रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. याबाबतचा शासन निर्णयही ८ फेब्रुवारी २०२२ रोजी निर्गमीत करण्यात आला आहे.

२२ व २३ जुलै, २०२१ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील मौजे तळीये, कोंडाळकरवाडी व बौध्दवाडी, मौजे केवनाळे व पोलादपूर तालुक्यातील मौजे साखर (सुतारवाडी) या गावांच्या तात्पुरत्या पुनर्वसनाच्या प्रस्तावासही शासनाने मान्यता दिली असल्याने जिल्हाधिकारी, रायगड यांनी प्रस्तावित केल्यानुसार कंटेनर चौथरा तयार करणे, नळ पाणी पुरवठा योजना करणे तसेच रस्ते व ड्रेनेज लाईन तयार करणे इत्यादी कामांसाठी

.../२

## तरूणाचा बुडून मृत्यु

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गणपती विसर्जनासाठी गेलेल्या तरूणाचा बुडून मृत्यु झाल्याची घटना पनवेल शहरातील कोळीवाडा परिसरात घडली आहे.

राम अनंता शेलार (वय-२२) हा रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास गणपती विसर्जनासाठी खाडीत गेला असता त्याचा तेथे बुडून मृत्यु झाला आहे. आज सकाळी त्याचा मृतदेह खाडीत सापडला. सदर मुलगा हा एकुलता एक होता. त्याच्या दुर्दैवी मृत्युमुळे कोळीवाडा परिसरात शोककळा पसरली आहे.

## कानपोली येथील भाजपच्या सरपंच व उपसरपंचांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश



**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे व युवासेना प्रमुख तथा राज्याचे पर्यावरण, पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांच्या कार्यप्रणालीवर प्रेरित होऊन व शिवसेना नेते व संपर्क नेते कोंकण विभाग तथा राज्याचे उद्योग व खनिकर्म मंत्री सुभाष देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड पनवेल शिरीष घरत यांच्या नेतृत्वाखाली व पनवेल तालुका संपर्कप्रमुख योगेश तांडेल यांच्या विशेष प्रयत्नाने ग्रामपंचायत कानपोली येथील भाजपच्या सरपंच सौ. विजया कैलास पाटील, उपसरपंच नागा गिरा, सदस्य हिरामण उघडा व त्यांच्या सहकाऱ्यांनी शिवसेना पक्षात जाहीर पक्ष प्रवेश केला.

यावेळी रायगड उपजिल्हा संघटक परेश पाटील, पनवेल तालुका संघटक भरत पाटील, विधानसभा संघटक दिपक निकम, तालुका सन्मवयक प्रदीप ठाकूर, पनवेल महानगरप्रमुख रामदास शेवाळे, तालुका प्रमुख एकनाथ म्हात्रे, उपशहर प्रमुख नविन पनवेल ज्ञानेश्वर भंडारी, शाखा प्रमुख कानपोली प्रदीप पाटील, शाखा प्रमुख वावंजे सतिश पाटील आदि पदाधिकारी उपस्थित होते.

## पोलादपूरनजिक ट्रक-मोटार सायकल अपघात ; १ ठार

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील पोलादपूर महाबळेश्वर मार्गावरील कापडे ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील रानबाजिरे गांवाच्या तीव्र वळण उतारावर ट्रकला ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात मोटारसायकलच्या झालेल्या अपघातानंतर जखमी अवस्थेत प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी पाठविण्यात आलेल्या मोटारसायकलस्वाराचा दुर्दैवी अंत झाला आहे. सोमवारी सायंकाळी अपघात झाल्यानंतर काही वेळातच तरूणाची प्राणज्योत मालवली.



पोलादपूर शहरानजिक कापडे बाजूकडून पोलादपूरच्या दिशेने निलेश कृष्णा सुतार (३०,साखर-सुतारवाडी, ता.पोलादपूर) रानबाजिरे गावाच्या हद्दीत सोमवारी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास भरधाव वेगाने मोटारसायकल चालवित आला. यावेळी ट्रक क्रमांक एमएच ०४ केएफ ०६०७ पोलादपूरच्या दिशेने जात असताना निलेश कृष्णा सुतार याने मोटारसायकलचा वेग कमी न करताच ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला. यावेळी रस्त्याच्या डाव्या बाजूला असलेल्या दगडाला मोटारसायकलची ठोकर मारून वाहनाच्या नुकसानीस तसेच स्वत:च्या शरीराला छोट्या म ोठ्या जखमा होऊन मृत्यूस कारणीभूत ठरला.

याप्रसंगी सहायक पोलीस निरिक्षक प्रशांत जाधव यांनी अपघातस्थळी भेट देऊन पाहणी केली आणि जखमीवर तातडीने उपचार करण्यासाठी पोलादपूर ग्रामीण रूग्णालयात पाठविले. यानंतर जखमीला प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी महाडला पाठविले असता त्याचा वाटेतच मृत्यू झाला. याप्रकरणी मयत निलेश सुतार याच्याविरूध्द भा.द.वि. सं. २७९,३३७, ३३९, ३०४ तसेच मोटारवाहन कायदा कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी सहायक फौजदार भोसले हे वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास करीत आहेत.

# परळी येथे अवैध पार्किंग करणाऱ्यांवर वाहतूक पोलिसांची धडक कारवाई , 30 हजारांची दंड वसूली

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

पाली खोपोली राज्य महामार्गावर सुधागड तालुक्याचे प्रवेशद्वार म्हणून ओळख असलेल्या परळी बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत आहे. अस्ताव्यस्त लावलेली वाहने त्यामुळे वाहनचालकांना त्रास सहन करावा लागतोच शिवाय बाजारहाट करण्यासाठी आलेल्या ग्रामस्थांना देखील रस्त्याने चालणे मुश्किल होते. यासंदर्भात वारंवार परळी ग्रामपंचायत व पाली पोलीस यांनी मार्ग काढण्याचा प्रयत्न केला.

ग्रामस्थांनी देखील परळी बाजारपेठेतील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडवावा अशी मागणी केली होती. पोलिसांनी कारवाई केली की थोडे दिवस वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटायचा. परंतु दोन तीन दिवसानंतर पुन्हा वाहतूक कोंडी निर्माण व्हायची.




या पार्श्वभूमीवर पाली पोलिसांच्या वाहतूक शाखेने तसेच पाली पोलिस ठाणे अंतर्गत जांभुळपाडा पोलीस दूर क्षेत्राचे पोलीस यांनी संयुक्तरीत्या परळी बाजारपेठेत धडक मोहीम राबविली. या धडक मोहिमेत साधारणपणे ५८ केसेस करण्यात आल्या तर २९,५०० रुपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आली. यावेळी ए.एस. आय. मोहन म्हात्रे, एस. एस. खेडेकर, निलेश महाडिक, कांचन भोईर, बी. एच. वाव्हळ आदी पोलीस कर्मचारी उपस्थित होते. पोलिसांनी केलेल्या कारवाईमुळे परळीकर समाधान व्यक्त करत असून पोलिसांनी अशाच प्रकारची कारवाई अधून मधून करावी अशी मागणी जोर धरत आहे.

# मराठी इंडियन आयडॉल मधील स्पर्धक कु. सागर विश्वास म्हात्रे यास वोट देण्याचे आवाहन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आपल्या सुरेल आवाजाने संपूर्ण महाराष्ट्रातील रसिकांना मंत्रमुग्ध करणारे तसेच आपल्या रायगड व नविमुंबई नगरीचे नाव मोठे करणारे मराठी इंडियन आयडॉल मधील स्पर्धक कु. सागर विश्वास म्हात्रे यांच्या सुरेल गायनाचा रसिकांना मंत्रमुग्ध करणारा पुढील परफॉरमन्स बुधवार दि. ९ फेब्रुवारी २०२२ रोजी रात्री ९.०० ते १०.०० वाजता होणार आहे. या हुरहुन्नरी कलाकारास वोट करून त्यास आशीर्वाद द्यावेत. असे आवाहन त्यांच्या कुटुंबीयानी केले आहे.

आपल्या रायगड नवी मुंबई, पनवेल, उरण नगरीचे नाव उंचावणारे महाराष्ट्राचे लाडके गायक कु. सागर म्हात्रे यांना आपले मौल्यवान वोट देऊन मराठी इंडियन आयडॉलचा 'किताब आपल्या नगरीत आणू या. असे आवाहन करण्यात येत आहे.




वोट देण्याची अगदी सोपी पद्धत

१.गुगल प्ले स्टोअर वरून Sony Live हे app डाउनलोड करावे.

लिंक https://play.google.com/store/apps/details?id=com.sonyliv

२. कार्यक्रम चालू असताना या app मध्ये प्रवेश करून तीँश छु या बटनावर क्लीक करून आपण कु. सागर म्हात्रे यास आपले मौल्यवान वोट द्या.

३. एकदा इन्स्टॉल केलेल्या एका app मधून आपण १०० वोट देऊ शकता.

४.वोट देण्यासाठी Sony Live app चे कोणतेही Subscription घेणे आवश्यक नाही . तुम्ही विनामूल्य १०० वोट करू शकता.

कु.सागर म्हात्रे यांना खालील लिंक वर जाऊन इंस्टाग्राम वर फॉलो करा.

https://www.instagram.com/sagarmhatreofficial/

# संजय जैन यांना मातृशोक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहर भाजपचे खजिनदार संजय मोतीलाल जैन यांच्या मोतोश्री स्व. सरस्वतीदेवी मोतीलाल जैन यांचे ६ फेब्रुवारी २०२२ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो ही प्रार्थना, त्यांची शोकसभा ९ फेब्रुवारी २०२२ रोजी ११ ते १ वाजेपर्यंत विरु-पाक्ष मंगल कार्यालय, अशोक बागे समोर पनवेल या ठिकाणी आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्वांनी उपस्थित रहावे.

अर्जदारातर्फे वकील : अनंत देवजी पाटील

## जाहीर नोटीस

अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्यायाधिकरण साो.रायगड यांचे कोर्टात

मो.अप.क्लेम. नं.६९/२०१८
नि.नं.१५/ड
ने.ता.२५/०२/२०२२

मंगलाबाई गोटीराम पाटील वगैरे ४ — अर्जदार

विरुद्ध

१) संतोष बाबुराव मोहिते
२) दि न्यू इंडिया इन्श्युरन्स कं.लि. — सामनेवाला

प्रति,
सामनेवाला नं.१) संतोष बाबुराव मोहिते
प्लॉट नं३९/३४, गोखले हायस्कूलजवळ,
सेक्टर-१२, खारघर, पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र ४१०२०३

दिनांक ०५/०२/२०१८ रोजी पहाटे ०५:१५ वाजण्याच्या सुमारास मौजे पनवेल हद्दीत, जुना-मुंबई हायवेवरील, पळस्पे फाट्याचे जवळ, टाटा मोटार सर्व्हीस सेन्टरच्या समोर, पुणे लेनवर, पनवेल शहर पोलीस स्टेशन, नवी मुंबई, जि.रायगड यांचे हद्दीत सदरचा अपघात घडला. सदर अपघातामध्ये अर्जदार नं.१ यांचे पती, अर्जदार नं.२ व ५ यांचे वडील गोटीराम पांडुरंग पाटील हे मयत झालेले आहेत.

सदर अपघातामध्ये ट्रेलर बॉडी क्र.एम.एच.४६/बी.बी.३९९१ वरील चालक हा मयत गोटीराम पांडुरंग पाटील यांच्या मरणास कारणीभूत ठरला आहे.

म्हणून अर्जदार यांनी सामनेवाला विरुद्ध अपघात नुकसान भरपाई मिळणेकरिता अंदाजे रु.८,००,०००/- चा नुकसान भरपाईचा क्लेम अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्यायाधिकरण यांचे कोर्टात दाखल केला आहे.

तरी तुम्हास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुम्ही सदर अर्जाचे कामी या न्यायालयात दि.२५/०२/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता तुम्ही प्रत्यक्ष कायदेशीर वकीलांमार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे सादर करावे व आपला पत्ताही न्यायालयात सादर करावा. या मुदतीत आपण न्यायालयात हजर न राहिल्यास सदरहू अर्जाच्या कामी आपल्या विरुद्ध पुढील आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज तारीख ४/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक जि.न्याया.रायगड-अलिबाग | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक जि.न्याया.रायगड-अलिबाग

अर्जदाराचे वकील
अॅड.जि.व्ही.मुकणे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१६३२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१३/०४/२०२२

श्री.सतीश चंद्रकांत वंजारी
वय : ६३ वर्षे, धंदा : नोकरी
रा.६/३०४, गुरुप्रसाद, विंग सी, २ रा क्रॉस रोड,
स्वामी समर्थ नगर, अंधेरी वेस्ट, मुंबई — अर्जदार

१) अर्जदार यांची मावशी कै.लता काशिनाथ मळीक ह्या दि.२१/०७/२०२१ रोजी कोकीलाबेन धिरुबाई अंबानी हॉस्पिटल के वेस्ट वॉर्ड मुंबई येथे बिना मुलबाळानिशी मयत झालेले आहेत. तसेच त्यांचे पती कै.काशिनाथ महादेव मळीक हे दि.०८/०७/२००५ रोजी पनवेल या ठिकाणी मयत झालेले आहेत. तसेच कै.लता काशिनाथ मळीक यांचे आई कै.गोपिका वामन काणेकर ह्या फेब्रुवारी १९८९ रोजी पेण या ठिकाणी मयत झाले आहेत तसेच त्यांचे वडील कै.वामन काणेकर हे देखील १९५३ साली पेण या ठिकाणी मयत झालेले तसेच त्यांची सख्खी बहिण कै.कुसुम चंद्रकांत वंजारी ह्या देखील दि.०२/०१/२००७ रोजी मुंबई अंधेरी या ठिकाणी मयत झाल्या आहेत. तसेच कै.लता काशिनाथ मळीक ह्या बिन मुल बाळानिशी मयत झाल्या असल्याने त्या अर्जदारांशिवाय अन्य कोणीही वारस नाही. तसेच पेंन्शनची रक्कम कै.लता काशिनाथ मळीक यांच्या नावे व मालकीची जंगम मिळकत रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड शाखा पनवेल या बँकेत आहे.

२) अर्जदारांची मावशी कै.लता काशिनाथ मळीक यांचे नावे खालील जंगम वर्णनाचे मिळकत आहे.

**जंगम मिळकतीचे वर्णन**

**अ) रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेडमध्ये एफ.डी.पावती क्रं.०६०२/४२८९२४६/२, एफ.डी.खात्यातील रक्कम रु.२,४०,६००/- (रुपये दोन लाख चाळीस हजार सहाशे मात्र)**

**ब) रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेडमध्ये बचत खाते क्रं.०१०१/२०५४९ मध्ये रक्कम रु.२,२२,४७४.०२ (रुपये दोन लाख बावीस हजार चारशे चौऱ्याहत्तर पॉईंट शुन्य दोन मात्र)**

३) अर्जदार यांची मावशी कै.लता काशिनाथ मळीक यांच्या जंगम मिळकतीबाबत फायदे घेण्याकरिता अर्जदार यांस सक्सेशन दाखला / वारसदाखला मिळणे आवश्यक आहे. तसेच अर्जदार यांस वारस दाखला मिळणे कायद्याचे दृष्टीने योग्य व उचित आहे. सबब अर्जदार यांनी सदरचा अर्जात नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.लता काशिनाथ मळीक यांचे वारस असल्याबाबतचा सक्सेशन दाखला मिळवून घेण्याकरिता सदरचा अर्ज मे.कोर्टात दाखल केलेला आहे.

४) त्याअर्थी सदर वर नमूद केलेली जंगम मिळकत ही अर्जदार यांची मावशी कै.लता काशिनाथ मळीक यांची आहे व त्यांना वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला/सक्सेशन दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख ५/२/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# स्वछता मोहिमेचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पालिका प्रशासनावर स्वच्छतेच्या बाबतीत अवलंबून न राहता पनवेल महानगरपालिकेचे स्वच्छता दूत त्यांच्यासोबत स्वयंस्फूर्तीने माझ्या जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या सभासदांच्या सोबत इश फाउंडेशन, झिरो फाउंडेशन, युवा फाउंडेशन, सुमन साळी महिला व बाल विकास संस्था, अक्षरवेल ज्योती फाउंडेशन, लायन्स क्लब ऑफ कामोठे, पंजाबी कल्चर अँड वेल्फेअर असोसिएशन, लक्ष्यपूर्ती वेलफेअर फेडरेशन या सर्व सामाजिक संस्था आणि त्यांचे सदस्य तसेच खारघर मधील नागरिकांनी स्वछता मोहिमेचे आयोजन केले होते.

पनवेल महानगरपालिका स्थापन झाल्यापासून नागरिकांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. अशा परिस्थितीत पालिका प्रशासनावर अवलंबून न राहता सामाजिक संस्थांनी पुढाकार घेऊन हा सुरू केलेला उपक्रम खूपच कौतुकास्पद आहे. विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे या स्वच्छता मोहिमेच्या कार्यक्रमात सहभागी झाले. त्यांच्या सोबत त्यांच्या संस्थेच्या सभासदांनी सुद्धा श्रमदान केले.



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते आहे की, खालीलप्रमाणे वर्णन केलेली शॉप / गाळा मिळकत ही मालक / भोगवटादार श्री.जमीर अहमद कादरी, रा.सी-३०३, यश रेसिडेन्सी, जी.बी.रोड, माझगाव, डॉकयार्ड रोड, मुंबई-४०००१० यांचे नावे दाखल आहे. सदरहू मिळकत आमचे अशिल हे कायमस्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदरहू शॉप / गाळा मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**शॉप / गाळा मिळकतीचे वर्णन**

**लीटल वर्ल्ड मॉल, शॉप नं.२१४,**
**दुसरा मजला, प्लॉट नं.२१,**
**सेक्टर-०२, खारघर नवी मुंबई**
**क्षेत्र ३३० चौ.फूट**

वर नमूद केलेल्या शॉप / गाळा मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा अथवा व्यक्तींचा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, दिवाणी दावा, महसूलवाद असल्यास त्याच्या लेखी हरकती त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रामदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाच्या आत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे हरकत मुदतीत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल नमूद केलेले मालक / भोगवटादारा बरोबर ठरलेला कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०८/०२/२०२२

**सही/-**
**अॅड.अमित बाळाराम पाटील**
**यशोकिरण सोसायटी, ऑफिस नं.०५,**
**तळमजला, सावरकर चौक, लोखंडीपाडा,**
**पनवेल, ता.पनवेल-४१०२०६**

मा.मुजावर साहेब

अॅड.शेखर खोपकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१८४९/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.८/०३/२०२२

१) श्रीमती.यमुनाबाई नामदेव गोंधळी
वय : ७६ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.तुकाराम नामदेव गोंधळी
वय : ६१ वर्षे, धंदा : शेती
३) श्रीमती.हौसा उर्फ हौसाबाई राम भोईर
वय : ६६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.कोपर (गव्हाण), ता.पनवेल, जि.रायगड
४) श्रीमती.तुळसा भरत नाईक
वय : ५५ वर्षे, धंदा : गृहिणी
५) श्रीमती.लक्ष्मी दत्ता म्हात्रे
वय : ५६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.रुम नं.२०१-२०२, शुभ निल शिवम, सेक्टर नं.११,
प्लॉट नं.४०, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड
६) श्रीमती.लिलाबाई धनाजी पाटील
वय : ६० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड
७) श्रीमती.शेवंती विश्वास नाईक
वय : ५४ वर्षे, धंदा : गृहिणी
८) श्री.निवृत्ती नामदेव गोंधळी
वय : ५१ वर्षे, धंदा : शेती
क्र.१,२,४,७ व ८ रा.बामणडोंगरी, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ ते ७ यांचे वडील मयत नामदेव कृष्णा गोंधळी हे दि.२१/१०/२०२१ रोजी मयत झाले आहेत. मृत्यूसमयी मयत नामदेव कृष्णा गोंधळी यांच्या नावे असलेल्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे : वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | यु.के.नं. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) |
|---|---|---|---|---|
| १ | वहाळ-७४+६८ (बी) | ३०१ | १ | ०-४२-२ |
| २ | वहाळ-७५ | २६६ | २ | ०-३९-० |
| ३ | वहाळ-९ | २९३ | ५ | ०-१५-० |
| ४ | वहाळ-९९ | ३३७ | १२ | ०-१४-० |

अर्जदार यांनी सदरील चौकशी अर्ज मयत नामदेव कृष्णा गोंधळी यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषित करून मिळणेकरिता दाखल केला आहे. सबब सदरील चौकशी अर्जाचे कामी अर्जदार यांचे क्लेम संबंधात जर कोणाचीही कसलीही हरकत असल्यास सदरची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात दाखल करावी. विहित मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभात वारस दाखला प्रदान करण्यात येईल हे सर्व कळावे.

ही नोटीस आज दि.०८/०२/२०२२ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# प्रारब्धाचे भोग कमी करण्यासाठी नामस्मरणात करीत रहा : प्रफुल्ला म्हसके-सुर्यवंशी

**दै.रायगड नगरी । तळा**

प्रत्येकमनुष्य सुखात असला कि नामस्मरण विसरतो पण दुःखात, अडचणीत असेल तर ते टाळण्यासाठी ईश्वराला हाका मारतो. म्हणजेच नामस्मरण करतो. प्रत्येक माणसाला प्रारब्धाचे भोग हे भोगावेच लागतात त्याची तीव्रता कमी करायची असेल तर सतत नामस्मरण करा.



महाभारतातील दाखले देऊन या कलीयुगात भवस-ागर तरून जाण्याचा एकमेव मार्ग आहे नामस्मरण करीत रहा याची प्रचीती घ्या. असा अमृतमय प्रवचनातून श्री स्वामी समर्थ साधकांना संदेश दिला तळा तालुक्यातील शेनाटे आदिवासी वाडी येथे श्री स्वामी समर्थ मानव विकास आध्यात्मिक केंद्र अंबरनाथ प्रणीत उपकेंद्राची स्थापना रथ सप्तमीच्या शुभमुहुर्तावर ७ फेब्रुवारी २२ रोजी करण्यात आली. सकाळी ९वा.गणेश पुजन, वास्तूशांती ११ वा. प्राणप्रतिष्ठा उद्घाटन श्रीमती.अस्मिता म्हस्के यांच्या शुभ हस्ते. १२ ते २ अमृतमय प्रवचन गुरुभगीनी सौ.प्रफुल्ला म्हस्के -सुर्यवंशी महा आरती, महाप्रसाद यावेळी अनेक श्री स्वामी भक्त सेवेकरी उपस्थीत राहून दर्शनाचा लाभ घेतला.

## जाहीर नोटीस

कर्जत येथील मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालयात

फौ.चौ.अर्ज क्र.३१/२०२२

श्री.नंदू भाऊ डायरे
वय : २८ वर्षे, व्यवसाय : शेती
रा.मु.अंत्राट तर्फे वरेडी, पो.सगवे,
ता.कर्जत, जि.रायगड ४१०१०१ — अर्जदार

विरुद्ध

ग्रामपंचायत पिंपळोली, निबंधक
जन्म मृत्यू नोंदणी कार्यालय नेरळ
पत्ता : मु.पो.पिंपळोली, ता.कर्जत, जि.रायगड — सामनेवाला

सदर जाहीर नोटीसद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांचे आजोबा कै.काशिनाथ पालू डायरे हे दि.१०/०२/१९८४ रोजी मु.अंत्राट तर्फे वरेडी ता.कर्जत, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. परंतु त्यांच्या मृत्यूची नोंदणी कोणत्याही शासकीय किंवा निमशासकीय कार्यालयामध्ये झालेली नाही. सदर अर्जदार यांनी त्यांच्या अजोबाची उशिरा मृत्यूची नोंद ग्रामपंचायत पिंपळोली येथे करणेकामी सदरचा अर्ज मे.न्ययालयात केलेला आहे. सदर अर्जाबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार किंवा हरकत असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हरकती दाखल कराव्यात. वरील मुदतीस कोणीही योग्य हरकती न दाखल केल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे लागलीच पुरावा घेतील व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

सदर नोटीस आज दि.०१/०२/२०२२ रोजी माझी सही तसेच कार्यालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक प्रथमवर्ग न्याय.कर्जत | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक प्रथमवर्ग न्याय.कर्जत

मुजावर साो.कोर्ट

अर्जदार यांचे वकील
अॅड.निलम भोसले

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.दिवाणी न्यायाधिश साहेब (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१७५२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१६/०३/२०२२

१) श्रीमती.शोभा रामदास धोत्रे
वय : ५९ वर्षे, धंदा : गृहिणी
२) कु.सविता रामदास धोत्रे
वय : ३९ वर्षे, धंदा : नोकरी
३) सौ.कविता रामदास धोत्रे
वय : ३८ वर्षे, धंदा : नोकरी
४) श्री.विनोद रामदास धोत्रे
वय : ३६ वर्षे, धंदा : नोकरी
५) सौ.अनिता रामदास धोत्रे
वय : ३५ वर्षे, धंदा : नोकरी
६) कु.अनिल रामदास धोत्रे
वय : ३२ वर्षे, धंदा : नोकरी
वरील सर्व रा.पीएल ५/१२, रुम नं.००२, सेक्टर १७,
सिडको कॉलनी, पनवेल, नवीन पनवेल-४१०२०६ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

१) तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, कै. रामदास रघुनाथ धोत्रे यांचे दि.२८/१२/२०१९ रोजी सुश्रुत हॉस्पिटल आणि नर्सिंग होम सेंटर, चेंबुर, मुंबई वेस्ट येथे निधन झाले आहे. यांच्या मालकीची व ताबेकब्जातील मिळकती १) मौजे : नवीन पनवेल येथील सदनिका नं.००२, पीएल ५/बिल्डींग नं.१२, सेक्टर १७, सिडको कॉलनी, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड दि.२९/१२/१९९४ रोजी मा.दुय्यम निबंधक, पनवेल यांचे कार्यालयात दस्तऐवज नं.पवल-३२४९-१९९४ अन्वये नोंदणीकृत झालेली आहे. २) मौजे : कोळखे, सदनिका नं.००३ व ००४, तळमजला, सदनिका नं.१०३ व १०४ पहिला मजला, सदनिका नं.२०३ व २०४ दुसरा मजला, सदनिका नं.३०४, तिसरा मजला, सदनिका नं.४०३ व ४०४ चौथा मजला, सी विंग, वास्तू आनंद अपार्टमेंट, जुना सर्व्हे क्र.१२३, हिस्सा नं.८ ब/२, नवीन गट क्र.२३२/३, बिनशेती प्लॉट नं.३, कोळखे, ता.पनवेल, जि.रायगड दि.२८/११/२०१९ रोजी मा.दुय्यम निबंधक, पनवेल यांचे कार्यालयात दस्ताऐवज नं.पवल ४-११३३४-२०१९ विकसन करारनामा अन्वये नोंदणीकृत झालेली आहे. येथील खालील वर्णनाच्या निवासी सदनिका ह्याा मिळकती आहेत, त्यांचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतींचे वर्णन**

**१) मौजे : नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

**मौजे : नवीन पनवेल, सदनिका नं.००२, पीएल ५/बिल्डींग नं.१२, सेक्टर : १७, सिडको कॉलनी, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

**२) मौजे : कोळखे, ता.पनवेल, जि.रायगड**

**मौजे : कोळखे, सदनिका नं.००३ व ००४ तळ मजला, सदनिका नं.१०३ व १०४ पहिला मजला, सदनिका नं.२०३ व २०४ दुसरा मजला, सदनिका नं.३०४ तिसरा मजला, सदनिका नं.४०३ व ४०४ चौथा मजला सी विंग, वास्तू आनंद अपार्टमेंट, जुना सर्व्हे क्र.१२३, हिस्सा नं.८ ब/२, नवीन गट क्र.२३२/३, बिनशेती प्लॉट नं.३, कोळखे, ता.पनवेल, जि.रायगड**

१) वर वर्णन करण्यात आलेली मिळकत ही कै.रामदास रघुनाथ धोत्रे यांच्या मालकीची व ताबेकब्जातील आहेत. कै.रामदास रघुनाथ धोत्रे यांचे नावे असलेली मिळकत ही अर्जदार यांचे नावे होण्यासाठी अर्जदार यांनी वारस दाखला मिळणेकरिता या मे.कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. कै.रामदास रघुनाथ धोत्रे यांना अर्जदार हेच सदर मिळकती संदर्भात कायदेशीर वारस आहेत. त्यांचे या हक्काबाबत कोणाही व्यक्तीस काही हरकत, आक्षेप असल्यास ही जााहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या मा.न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहून, आपल्या हरकती व आक्षेप दाखल कराव्यात. याप्रमाणे दिलेल्या कालावधीमध्ये योग्यरितीने हरकत न घेतल्यास हे मा.न्यायालय १) श्रीमती.शोभा रामदास धोत्रे, २) कु.सविता रामदास धोत्रे, ३) सौ.कविता रामदास धोत्रे, ४) श्री.विनोद रामदास धोत्रे ५) सौ.अनिता रामदास धोत्रे ६) कु.अनिल रामदास धोत्रे हे कै.रामदास रघुनाथ धोत्रे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचा दाखला सदर मिळकती संदर्भात देईल, याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जााहीर नोटीस आज दि.२८/१/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्याायलयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

पृष्ठ क्र.१ वरुन...

# कर्जत रेल्वे स्थानक प्रशासनाचा हलगर्जीपणा, रेल्वे प्रवाशांचा जीवास धोका

हलगर्जीपणामुळे रेल्वे प्रवाशांना खुपच मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागला. तरी, रेल्वे प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सदर गंभीर बाबीकडे जातीने लक्ष देऊन सुधारणा करावी अन्यथा भविष्यात एखाद्या रेल्वे प्रवाशास आपला जीव गमावावा लागेल अशी प्रतिक्रिया कर्जत रेल्वे पॅसेंजर असोसिएशन सचिव प्रभाकर गंगावणे यांनी व्यक्त केली.

# रायगड जिल्ह्यातील दरड कोसळलेल्या गावांच्या कायम पुनर्वसनाकरिता निधी मंजूर

आवश्यक एकूण रु. ५५ लाख ५८ हजार ३८४ रूपये इतक्या निधीपैकी ५०% म्हणजे एकूण रु. २५ लाख ७९ हजार १९२/- इतका निधी शासन निर्णयाद्वारे मंजूर करण्यात आला आहे. याबाबतचाही दिनांक ८ फेब्रुवारी २०२२ रोजी शासननिर्णय मदत व पुनर्वसन विभागाने निर्गमीत केलेला आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# पनवेल महानगरपालिका
## पाणी पुरवठा विभाग
## नागरिकांना जाहीर आवाहन

पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल शहरातील नागरिकांना सुचित करण्यात येते की, शहरास होणारा पाणी पुरवठा हा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व देहरंग धरण मिळून एकत्रितपणे करण्यात येतो. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ या संस्थेस पाताळगंगा नदीतून दर रविवार व सोमवार या दिवशी कमी पाणी मिळते व इतर काळात इलेक्ट्रीक शटडाऊन, ब्रेकडाऊनमुळे दोन्ही संस्थेकडून वारंवार कमी पाणी मिळत असल्याने देहरंग धरणाचे जास्त पाणी घेवून शहराची दररोजची गरज भासविण्यात येते. परंतु त्यामुळे धरणातील पाणीसाठा कमी झाला, ही वस्तुस्थिती विचारात घेता धरणातील शिल्लक असलेला पाणीसाठा माहे १५ जून २०२२ पर्यंत पुरविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. या दृष्टीने दि.१०/०२/२०२२ रोजीपासून पनवेल शहरामध्ये उंच जलकुंभ निहाय एक भाग आठवड्यातून एक दिवस बंद ठेवण्यात येणार आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | वार | उंच जलकुंभाचे ठिकाण | पाणी पुरवठा बंद राहणाऱ्या भागाचे नाव | पाणी पुरवठा सुरू राहणाऱ्या भागाचे नाव व वेळ | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | वेळ | पाणी सुरू राहणारा भाग |
| १ | सोमवार | सर्व्हिस हौद जुने उंच जलकुंभ | सुभेदार वाडा, गुणे हॉस्पिटल, शिवसेना कार्यालय ते भैरवनाथ डेअरी पर्यंत, भैरवनाथ डेरी ते ससाणे हॉस्पिटल पर्यंत, अशोक गार्डन सोसा. मेवाड हॉटेल ते मशिद पर्यंत, अर्बन को.ऑप.बँक ते साई पार्क, अर्बन को.ऑप.बँक ते गणपती पिरसर, गुडेकर डेअरी ते रेखी हॉटेल पर्यंत घाटे आळी, गावदेवी मंदिर परिसर, गुडेकर डेअरी ते पनवेल पॅलेस पर्यंत, परदेशी आळी ते अंबर सोसा. पर्यंत, गावदेवी पाडा भाग, गुणे हॉस्पिटल ते लाईफ लाईन हॉस्पिटल, दांडेकर हॉस्पिटल ते अच्युत मनोरे यांच्या घरापर्यंत, गुडेकर डेअरी ते घोडके हॉस्पिटल पर्यंत, परदेशी आळी सर्व बैठकी घरे, मेन व्हॉल, रचना रेसिडेन्सी सोसा. अष्टविनायक कॉलनी सर्व परिसर, गुणे हॉस्पिटल ते श्री.छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत. श्री लॉज ते निलेटा गार्डन पर्यंत, सुभेदार वाडा सर्व बैठी घरे, आदर्श हॉटेल ते श्री.छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत, यशोपुरम सोसा.आगरी समाज ते व्हि.के.हायस्कूल पर्यंत जुने पोस्ट ते डॉ.बुधकर दवाखान्यापर्यंत श्री गांगल यांच्या घरापर्यंत ते महाड बँक जय भारत नाका ते मेवाड हॉटेल पर्यंत, जय भारत नाका ते भिंडे यांच्या घरापर्यंत, गोडसे ओळी बैठी घरे, विरुपाक्ष मंदिर ते लोंढे मॅडम यांच्या घरापर्यंत, आदर्श हॉटेल ते आदित्य कॉम्प्लेक्स पर्यंत, मनिष मार्केट, जय भारत नाका ते बैठी घरे, जैन मंदिर पर्यंत, जय भारत नाका ते रतन टॉकीज पर्यंत, त्रिमुर्ती सहनिवास सोसा. अन्नपूर्णा हॉटेल ते निसर्ग बिल्डींग पर्यंत, गोखले हॉल ते प्रज्ञा सोसायटी पर्यंत, मालधक्का परिसर, नवनाथ झोपडपट्टी, शिवाजी नगर झोपडपट्टी, सर्व्हीस हौद ते सम्राट हॉटेल पर्यंत, अंबिका नगर, लोकमान्य नगर | सकाळी ५.३० ते सकाळी ७.०० | माणिक नगर, स्नेहसदन सोसा., यशोदिप सोसा. |
| | | | | सकाळी ५.३० ते सकाळी ६.४५ पर्यंत | पटेल पार्क भाग, उपजिल्हा रुग्णालय |
| | | | | सकाळी ६.४५ ते सकाळी ८.०० पर्यंत | जैन मंदिर पासून भुसार मोहल्ला बैठी घरे |
| | | | | सकाळी ८.०० ते सकाळी ९.३० पर्यंत | पंचायत समिती झोपडपट्टी, कोहिनुर टेक्निकल ते किंग इलेक्ट्रॉनिक पर्यंत, कोहिनुर टेक्निकल ते नवनाथ मंदिरा पर्यंत, लक्ष्मी वसाहत |
| | | | | सकाळी ९.३० ते सकाळी १०.४५ पर्यंत | मामलेदार कचेरी ते दत्तराज सोसायटी |
| | | | | सकाळी १०.४५ ते दुपारी १२.०० पर्यंत | साठे गल्ली, विरुपाक्ष मंदिर ते साहिल सोसायटी पर्यंत, सिटी स्टोअर्स गल्ली, सिनिअर ज्युनियर गल्ली, आगरी समाज हॉल ते घोडके हॉस्पिटल पर्यंत |
| | | | | दुपारी १२.०० ते दुपारी १.१५ पर्यंत | गायकर गल्ली सर्व बैठी घर, शुभलाभ सोसा ते सहयोग नगर पर्यंत |
| | | | | दुपाारी १.१५ ते दुपारी २.३० पर्यंत | सुतिका गृह ते यशोमंगल सोसायटी पर्यंत, उमा शंकर सोसा. ते यशोवर्धन पर्यंत |
| | | | | दुपारी २.३० ते दुपारी ३.४५ पर्यंत | आदर्श हॉटेल ते रत्नेश अपार्टमेंट पर्यंत |
| | | | | दुपारी ३.४५ ते सायं.५.०० | कुबेर सोसायटी ते शुभलाभ सोसायटी, धुतपापेश्वर ते मुनोथ नगर पर्यंत |
| | | | | सायं.५.०० ते सायं.६.१५ | मुनोथ नगर ई विंग |
| | | | | सायं.६.१५ ते सायं.९.१५ | प्रिन्स पॅराडाईज सोसा सनराईज सोसा. केशव सोसायटी |
| २ | मंगळवार | सर्व्हिस हौद जुने उंच जलकुंभ | माणिक नगर, स्नेहसदन सोसायटी, यशोदिप सोसायटी, पटेल पार्क भाग, उपजिल्हा रुग्णालय, जैन मंदिर पासून भुसार मोहल्ला बैठी घर, पंचायत समिती झोपडपट्टी, कोहिनूर टेक्निकल ते किंग इलेक्ट्रॉनिक पर्यंत, कोहिनूर टेक्निकल ते नवनाथ मंदिरा पर्यंत, मामलेदार कचेररी ते दत्तराज सोसायटी, साठे गल्ली, विरुपाक्ष मंदिर ते साहिल सोसायटी पर्यंत, सिटी स्टोअर्स गल्ली, सिनिअर ज्युनिअर गल्ली, आगरी समाज हॉल ते घोडके हॉस्पिटल पर्यंत, गायकर गल्ली सर्व बैठी घर, शुभलाभ सोसा ते सहयोग नगर पर्यंत, सुतिका गृह ते यशोमंगल सोसायटी पर्यंत, उमा शंकर सोसा. ते यशोवर्धन पर्यंत. आदर्श हॉटेल ते रत्नेश अपार्टमेंट पर्यंत, कुबेर सोसायटी ते शुभलाभ सोसायटी, धुतपापेश्वर ते मुनोथ नगर पर्यंत. मुनोथ नगर ई विंग प्रिन्स पॅराडाईज सोसा., सनराईज सोसा. केशव सोसायटी. | पहाटे ५.३० ते सकाळी ६.४५ | शिवसेना कार्यालय ते भैरवनाथ डेअरी पर्यंत, अशोका गार्डन सोसा. |
| | | | | सकाळी ६.३० ते सकाळी ७.३० | मेवाड हॉटेल ते मशिद पर्यंत |
| | | | | सकाळी ७.३० ते सकाळी ८.३० | अर्बन बँक ते साई पार्क |
| | | | | सकाळी ८.०० ते सकाळी ९.१५ | अर्बन बँक ते गणपती परिसर |
| | | | | सकाळी ९.१५ ते सकाळी ११.०० | श्री गांगल यांच्या घरापर्यंत ते महाड बँक जय भारत नाका ते भिंडे यांच्या घरापर्यंत |
| | | | | सकाळी ६.४५ ते सकाळी ८.१५ | गुडेकर डेअरी ते रेखी हॉटेल पर्यंत घाटे आळी, गावदेवी परिसर |
| | | | | सकाळी ८.१५ ते सकाळी ९.३० | गुडेकर डेअरी ते पनवेल पॅलेस पर्यंत, परेदशी आळी ते अंबर सोसा. पर्यंत, गावदेवी पाडा भाग |
| | | | | सकाळी ९.३० ते सकाळी ११.०० | गुणे हॉस्पिटल ते लाईफ लाईन हॉस्पिटल |
| | | | | सकाळी ११.१५ ते दुपारी १२.३० | दांडेकर हॉस्पिटल ते अच्युत मनोरे यांच्या घरापर्यंत, गुडेकर डेअरी ते घोडके हॉस्पिटल पर्यंत, परदेशी आळी सर्व बैठी घरे. घोडके आळी बैठी घरे, विरुपाक्ष मंदिर ते लोंढे मॅडम यांच्या घरापर्यंत |
| | | | | दुपारी १२.३० ते दुपारी १.४५ | जय भारत नाका ते बैठी घरे पर्यंत जैन मंदिर पर्यंत |
| | | | | सकाळी ११.१५ ते दुपारी १.४५ | आदर्श हॉटेल ते अदित्य कॉम्प्लेक्स पर्यंत मनिष मार्केट जैन |
| | | | | दुपारी १.४५ ते दुपारी ३.०० | जय भारत नाका ते रतन टॉकीज पर्यंत |
| | | | | दुपारी ३.०० ते दुपारी ४.१५ | त्रिमुर्ती सहनिवास सोसा. |
| | | | | दुपारी १२.३० ते दुपारी ३.०० | मेन व्हॉल |
| | | | | दुपारी ३.०० ते सायं. ५.०० | अन्नपूर्णा हॉटेल ते निसर्ग बिल्डींग पर्यंत |
| | | | | सायं.४.१५ ते सायं. ५.३० | गोखल हॉल ते प्रज्ञा सोसायटी पर्यंत |
| | | | | दुपारी १२.३० ते दुपारी १.४५ | रचना रेसिडेन्सी सोसा. अष्टविनायक कॉलनी सर्व परिसर, गुणे हॉस्पिटल ते शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत |
| | | | | दुपारी १.४५ ते दुपारी ३.०० | श्री लॉज जे निलेटा गार्डन पर्यंत, सुभेदार वाडा सर्व बैठी घरे, आदर्श हॉटेल ते शिवाजी महाराज पर्यंत |
| | | | | दुपारी ३.०० ते दुपारी ४.१५ | यशोपुरम सोसा. आगरी समाज हॉल ते व्हि.के. हायस्कूल पर्यंत |
| | | | | दुपारी ४.१५ ते सायं. ५.३० | जुने पोस्ट ते डॉ.बुधकर दवाखान्यापर्यंत |
| | | | | सायं.४.०० ते सायं.६.०० | अंबिका नगर |
| ३ | सोमवार | मार्केट यार्ड उंच जलकुंभ | **मार्केट यार्ड उंच जलुंभातून होणारा पाणी पुरवठा बंद राहील.** | ------ | **मार्केट यार्ड उंच जलकुंभातून होणारा पाणी पुरवठा बंद राहील.** |
| ४ | सोमवार | भाजी मार्केट उंच जलकुंभ | **भाजी मार्केट उंच जलकुंभातून होणारा पाणी पुरवठा बंद राहील** | | **भाजी मार्केट उंच जलकुंभातून होणारा पाणी पुरवठा बंद राहील.** |
| ५ | मंगळवार | पटेल मोहल्ला उंच जलकुंभ | **पटेल मोहल्ला उंच जलकुंभातून होणारा पाणी पुरवठा बंद राहील** | | **पटेल मोहल्ला उंच जलकुंभातून होणारा पाणी पुरवठा बंद राहील** |
| ६ | बुधवार | | **शहरातील सर्व भागातील पाणी पुरवठा सुरू राहील.** | | **शहरातील सर्व भागातील पाणी पुरवठा सुरू राहील.** |
| ७ | गुरुवार | ठाणा नाका उंच जलकुंभ | **ठाणा नाका उंच जलकुंभातून व पायोनिअर सोसायटी परिसर होणारा पाणी पुरवठा बंद राहील** | | **ठाणा नाका उंच जलकुंभातून व पायोनिअर सोसायटी परिसर होणारा पाणी पुरवठा बंद राहील.** |
| ८ | गुरुवार | सर्व्हीस हौद नवीन उंच जलकुंभ | सुनील बहिरा ऑफिस ते उर्दू शाळा परिसर पर्यंत, पगडे आळी परिसर पर्यंत, तक्का गाव एकविरा मंदिर परिसर पर्यंत, तक्का गाव शाळा, परिसर व भगत आळी, सावंतामाळी हॉल परिसर, आझाद नगर झोपडपट्टी एन.के.हेरीटेज सोसा.साईबाबा मंदिर परिसर, निलसिद्धी गार्डन, न्यू ईडन गार्डन सोसा. रिद्धी हाऊस व सिद्धी हाऊस सोसा. पर्यंत, कातकरीवाडी ते प्रजापती कॉम्प्लेक्स पर्यंत वैद्यवाडी, गोदरेज सोसा. **मिडलक्लास सोसा. (भाग-१)** आमदार निवास रोड परिसर, प्लॉट नं.११ ते प्लॉट नं.१ पै मॅडम निवास पर्यंत, विश्राळी तलाव ते पंजाब हॉटेल, पेट्रोल पंप पर्यंत विश्राळी नाका ते पंजाब हॉटेल पर्यंत, विश्राळी तलाव झोपडपट्टी परिसर **मिडलक्लास सोसायटी भाग २-** गांधी हॉस्पिटल, आय.सी.सी.आय. बँक पर्यंत, गांधी हॉस्पिटल ते ॲक्सिस बँक पर्यंत, प्लॉट नं.६४ ते रायगड बँक पर्यंत, शेषगिरी बंगला ते अमेय हॉस्पिटल पर्यंत, प्लॉट नं.३६ ते रुपाली टॉकीज पर्यंत | सायं.७.०० | मेन व्हॉल खुटकर व्हॉल, पन्नास नंबर व्हॉल |
| | | | | सायं.८.०० ते रात्री ९.३० | मेन व्हॉल, कस्तुरी ABCD सोसा नं.१, कस्तुरी सोसा. नं.२, (AA BB), कस्तुरी सोसा नं.२ (EFG), कस्तुरी नं.१ सोसा. (कस्तुरी नवीन लाईन ३ ABCD), नॅशनल गॅलेक्सी सोसा., नॅशनल रेसिडेन्सी सोसा., हॉयलॅन्ड पार्क सोसा. मोराज छोटा गेट परिसर |
| | | | | रात्री ११.०० ते पहाटे १२.३० | नॅशनल पॅरराडाईज सोसा., गंगाजमुना सोसा. सन गंगौत्री सोसा. MA टाईप सोसा, KL मोराज सोसा., नॅशनल गार्डन सोसा. कॉस्मो पॉलिटेक्निकल सोसा. |
| | | | | पहाटे १२.३० ते पहाटे २.०० | नॅशनल पॅलेस D सोसा, नॅशनल पॅलेस ABC सोसा. कॉस्मो पॉलिटेक्निकल सोसा. CD wing तक्का MECB, कांडपिळे रेसिडेन्सी सोसा. गोविंद हारमोनियम सोसा. पर्लहोम सोसा. |
| | | | | पहाटे २.०० ते पहाटे ३.०० | टाकी भरणे |
| | | | | पहाटे ३.०० ते पहाटे ५.०० | मोराज मोठा गेट परिसर, (मोराज MA १,२,३,४ T, T2, T3, T4, S, S2, S3, S4, S5, S6, मोराज तापी नर्मदा, मोराज R, R2, R3, R4, K3, K4, MA, KL |
| ९ | शुक्रवार | सर्व्हीस हौद नवीन उंच जलकुंभ | मेन व्हॉल खुटकर व्हॉल, पन्नास नंबर व्हॉल मेन व्हॉल, कस्तुरी ABCD सोसा नं.१, कस्तुरी सोसा. नं.२, (AA BB), कस्तुरी सोसा नं.२ (EFG), कस्तुरी नं.१ सोसा. (कस्तुरी नवीन लाईन ३ ABCD), नॅशनल गॅलेक्सी सोसा., नॅशनल रेसिडेन्सी सोसा., हॉयलॅन्ड पार्क सोसा. मोराज छोटा गेट परिसर, नॅशनल पॅरराडाईज सोसा., गंगाजमुना सोसा. सन गंगौत्री सोसा. MA टाईप सोसा, KL मोराज सोसा., नॅशनल गार्डन सोसा. कॉस्मो पॉलिटेक्निकल सोसा. | सकाळी ६.०० ते सकाळी ७.१५ | पगडे आळी परिसर पर्यंत, तक्का गाव पूर्ण एकविरा मंदिर परिसर पर्यंत, भगत आळी पर्यंत सावता माळी हॉल परिसर |
| | | | CD wing तक्का MECB, कांडपिळे रेसिडेन्सी सोसा. गोविंद हारमोनियम सोसा. पर्लहोम सोसा. मोराज मोठा गेट परिसर, (मोराज MA १,२,३,४ T, T2, T3, T4, S, S2, S3, S4, S5, S6, मोराज तापी नर्मदा, मोराज R, R2, R3, R4, K3, K4, MA, KL | सकाळी ९.३० ते सकाळी ११.०० | मेन व्हॉल, आझाद नगर सोसा. परिसर, एन.के.हेरिटेज सोसा. साईबाबा मंदिर परिसर, रिद्धी सिद्धी गार्डन सोसा., न्यू इडन गार्डन सोसा., रिद्धी हाऊस व सिद्धी हाऊस सोसा. कातकरीवाडी ते प्रजापाती कॉम्प्लेक्स पर्यंत वैद्यवाडी, गोदरेज सोसा. |
| | | | | दुपारी १.०० ते दुपारी २.१५ | मिडलक्लास सोसा.भाग-१ आमदार निवास रोड परिसर, प्लॉट नं.११ ते प्लॉट नं.१ पै मॅडम निवास पर्यंत, विश्राळी तलाव ते पंजाब हॉटेल, पेट्रोल पंप पर्यंत विश्राळी नाका ते पंजाब हॉटेल पर्यंत, विश्राळी तलाव झोपडपट्टी परिसर |
| | | | | दुपारी ४ ते सायं.५.१५ पर्यंत | मिडलक्लास सोसायटी भाग २- गांधी हॉस्पिटल, आय. सी.सी.आय. बँक पर्यंत, गांधी हॉस्पिटल ते ॲक्सिस बँक पर्यंत, प्लॉट नं.६४ ते रायगड बँक पर्यंत, शेषगिरी बंगला ते अमेय हॉस्पिटल पर्यंत, प्लॉट नं.३६ ते रुपाली टॉकीज पर्यंत |
| १० | शनिवार | | **शहरातील सर्व भागातील पाणीपुरवठा सुरू** | | शहरातील सर्व भागातील पाणीपुरवठा सुरू |
| ११ | रविवार | | **शहरातील सर्व भागातील पाणीपुरवठा सुरू** | | शहरातील सर्व भागातील पाणीपुरवठा सुरू |

**टिप : उपरोक्त वेळापत्रकामध्ये उपलब्ध पाणी पुरवठ्या नुसार वेळोवेळी बदल करण्यात येईल**

**सही/-**
**कनिष्ठ अभियंता**
**पनवेल महानगरपालिका**

**सही/-**
**उप अभियंता (पापु)**
**पनवेल महानगरपालिका**

# संक्षिप्त...

## मोटार सायकलीची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राहत्या घरासमोर उभी करून ठेवलेली मोटारसायकल अज्ञात चोरट्यांनी चोरल्याची घटना तालुक्यातील भिंगारवाडी येथे घडली आहे.

भिंगारवाडी येथील हरिभाऊ म्हात्रे चाळीत राहणारे हजिज मिरा शेख (वय-३०) यांची २५ हजारांची काळ्या रंगाची हिरोहोंडा पॅशन प्रो मोटारसायकल क्र.-एमएच ४६ एवाय ०६६४ हि राहत्या घरासमोर उभी करून ठेवलेली मोटारसायकल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली आहे. याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

## वेणगाव दलीतवस्ती विकास कामांसाठी २५ लाख रुपयांचा निधी

**दै.रायगड नगरी । कर्जत**

वेणगाव दलीतवस्ती येथील विकासकामांसाठी रायगड जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुधाकर घारे यांच्या माध्यमातून २५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

समाजातील प्रत्येक घटका पर्यंत विकास पोहचला पाहिजे या दृष्टिकोनातून प्रयत्न करणारे राजिप उपाध्यक्ष सुधाकर घारे यांच्या माध्यमातून वेणगाव बौद्धवस्ती येथील पाणी योजना, रस्ते, समाजमंदिर या कामांसाठी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून सदरील कामांचे भूमिपूजन राजिप उपाध्यक्ष सुधाकर घारे यांच्या संपन्न झाले, याप्रसंगी वेणगाव येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रेल्वे लाईट हाऊसच्या गटारात सापडला मृतदेह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील रेल्वे लाईट हाऊसच्या गटारात एका इसमाचा मृतहेद आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलिस करीत आहेत.

कोकण रेल्वे मार्ग पनवेल रेल्वे स्थानकाचे फलाट क्र.-१ पासून पश्चिमेस सुमारे ५० ते ६० मी. अंतरावर रेल्वे लाईट हाऊसच्या गटारात एका इसमाचा मृतहेद आढळून आला असून त्याचे अंदाजे वय २० ते २५ वर्षे आहे. उंची ५ फूट, रंग सावळा, अंगाने सडपातळ, डोक्याचे केस बारीक, दाढी कमी वाढलेली व तो नग्न अवस्थेत गटारात तरंगताना आढळून आला आहे. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलिस ठाणे दुरध्वनी-२७४५२३३३ किंवा सहा. पोलिस निरीक्षक अनिल देवळे यांच्याशी संपर्क साधावा.

# शिवसेना जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या अलिबाग-विरार कॉरीडोरच्या पाठपुराव्याला यश

### शेतकरी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती ; शेतकऱ्यांच्या मनातील संभ्रम दूर होण्यास झाली मदत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अलिबाग - विरार मल्टीमॉडेल कॉरीडोर प्रकल्पाच्या भू संपादन प्रक्रियेत शेतकऱ्यांकडून विरोध दर्शविला जात होता. यामध्ये अनेक शेतकऱ्यांमध्ये या प्रकल्पाबाबतची परिपूर्ण माहिती उपलब्ध होत नव्हती. मात्र या प्रकल्पामधील सत्यता शेतकऱ्यांना समजावी यासाठी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी समन्वय बैठक आयोजित करण्याबाबत प्रांताधिकाऱ्यांना निवेदन दिल्यानंतर आज दिनांक ८ फेब्रुवारी रोजी पनवेल प्रांताधिकारी कार्यालयात य बैठकीचे आयोजन करण्यात आले. यामध्ये शेतकऱ्यांमध्ये असलेले गैरसमज दूर करून याचा शेतकऱ्यांना होणारा फायदा समजावून सांगण्यात आला. अखेर शेतकऱ्यांना या बैठकीतील हेतु हा शेतकऱ्यांच्या हिताचा असल्याचे पटल्यामुळे जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या पाठपुराव्याला खऱ्या अर्थाने यश मिळाले आहे.



अलिबाग - विरार मल्टीमॉडेल कॉरीडोर प्रकल्पामध्ये शेतकऱ्यांना अधिकाधिक मोबदला कशा पद्धतीने मिळेल याकडे प्रामुख्याने प्रांत अधिकाऱ्यांनी लक्ष वेधून शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणले. यावेळी शेतकऱ्यांच्या मनात अनेक गैरसमज निर्माण झाले होते, त्यामध्ये शेतकऱ्यांचे हट्ट सुद्धा अनेक होते. मात्र यावेळी शासकीय अधिकारी म्हणून प्रांत अधिकाऱ्यांच्या विरोधात शेतकऱ्यांच्या भावना प्रखरतेने समोर येत होत्या, मात्र प्रांताधिकारी हे शेतकऱ्यांच्या बाजुनेच असून ते आपल्यासाठी सहकार्याची भावना ठेवत असल्याचे सांगत शिवसेनेचे पनवेल तालुका संपर्कप्रमुख योगेश तांडेल यांनी प्रांताधिकारी व शेतकऱ्यांमध्ये योग्य पद्धतीने समन्वय साधला. यावेळी उपस्थित विविध शेतकरी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी प्रांताधिकारी राहुल मुंडके यांच्याकडून शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय होण्याबाबत विनंती केली.

प्रांताधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या या समन्वय बैठकीला शिवसेनेचे जिल्हा समन्वयक दीपक निकम, पनवेल तालुका संघटक भरत पाटील, पनवेल तालुका संपर्कप्रमुख योगेश तांडेल, क्रांतिकारी सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष नामदेवशेठ फडके, विरार अलिबाग मल्टीमॉडेल कॉरीडोर बाधित शेतकरी संघटनेचे अपाध्यक्ष अरुण जळे, वामनशेठ शेळके, बोर्ले गावचे माजी सरपंच बाळकृष्ण पाटील आदींसह प्रमुख शेतकऱ्यांमध्ये नरेंद्र भोपी, सुभाष भोपी, डी.के.भोपी, बबन फडके, सुनील वसंत पाटील, दीपक पाटील, रमेश फडके, चंद्रकांत फडके, अनंता पाटील, नितीन भोपी, किसान माळी, रुपेश पवार, रोशन कडवं, बाळाराम फडके, राजेंद्र मेस्त्री, किशोर पाटील, प्रसाद पाटील, लहू पाटील, बाळाराम ठाकूर आदींसह शेतकरी बांधव उपस्थित राहिले होते.

# जिल्ह्यात लाल परीच्या उत्पन्नात दिवसाला 30 टक्क्यांनी वाढ प्रवाशांचा उत्तम प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

रायगड जिल्ह्यात आतापर्यंत राज्य परिवहन महामंडळाचे ४० टक्के कर्मचारी पुन्हा कामावर रुजू झाले आहेत. त्यामुळे ८ आगारांतून एसटीच्या दिवसाला सरासरी ४५० फेऱ्या होत आहेत. शिवाय प्रवाशांचा प्रतिसाद देखील चांगला मिळत आहे. परिणामी मागील महिन्यात जिल्ह्यात एसटीचे दिवसाला ७ लाख रुपये असणारे उत्पन्न या महिन्यापासून दिवसाला तब्बल १० लाखांवर गेले आहे.

मागील तीन महिन्यांपासून राज्य परिवहन मंडळाचे कर्मचारी संपावर गेले आहेत. यातील काही कर्मचारी पुन्हा कामावर परतत आहेत. यामुळे जिल्ह्यात देखील परिवहन मंडळाच्या गाड्या काही प्रमाणात धावतांना दिसत आहेत. गाड्यांच्या फेऱ्या हळूहळू वाढत असल्याने प्रवाशांच्या दृष्टीने खूप सोयीचे होत आहे. त्यामुळे अनेक प्रवासी स्थानकात व रस्त्यावर एसटीची वाट पाहतांना दिसत आहेत. लांब पल्ल्याच्या गाड्या देखील भरून जात आहेत. शिवाय कमी पल्ल्याच्या गाड्यांमुळे खेड्यापाड्यातील लोकांची काही अंशी सोय झाली आहे. अनेक लोक स्थानिक व्हॉट्सअप ग्रुप व फेसबुकवर गाड्यांचे वेळापत्रक आवर्जून शेअर करत आहेत. ज्यामुळे प्रवासी त्यावेळेस स्थानकात दाखल होतात. शिवाय त्यांना गाड्यांची माहिती देखील मिळते. अतिरिक्त खर्च करून खाजगी वाहनांनी जाणे वाचते. परिणामी प्रवाशांची वेळ व पैसे देखील वाचत आहेत असे एक प्रवाशाने सांगितले.



रायगड जिल्ह्यात कर्जत, पेण, अलिबाग, मुरुड, रोहा, माणगाव, महाड व श्रीवर्धन असे एकूण ८ आगार आहेत. एसटीच्या संपापूर्वी या आठही आगारांत जवळपास २२५२ कर्मचारी होते. ज्यामध्ये वाहक, चालक, प्रशासन, अधिकारी, लेखा, कारकून व यांत्रिक विभाग आदी विविध कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. यातील जवळपास ८५० ते ९०० कर्मचारी आजघडीला कामावर परतले आहेत. यामध्ये जवळपास २५० वाहन चालक व वाहक आहेत. या ८ आगारांत सर्वसाधारणपणे ४५० गाड्या आहेत. त्यातील ३५० गाड्या संपा आधी वापरल्या जात होत्या. सध्या संपामुळे यातील १०० गाड्या वापरल्या जात आहेत. आणि ८ आगारातून रोजच्या तब्बल ४५० फेऱ्या होत आहेत. मागील महिन्या पर्यंत या ८ आगरांतून दिवसाला एकूण ७ लाख उत्पन्न मिळत होते. मात्र या महिन्यात उत्पन्न दिवसाला १० लाखांवर गेले आहे. असाच प्रतिसाद राहिल्यास आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

# श्रीवर्धन प्रेसक्लबची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

रायगड प्रेस क्लबशी संलग्न असलेल्या श्रीवर्धनमधील पत्रकारांची संघटना श्रीवर्धन प्रेस क्लब ची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच श्रीवर्धन येथे पार पडली. मागील दोन वर्षांपासून कोरोना महामारी मुळे ही सभा होऊ शकली नव्हती. त्याचप्रमाणे श्रीवर्धन प्रेस क्लबची कोणतीही बैठक देखील होऊ शकली नव्हती. प्रेस क्लबच्या या बैठकीमध्ये विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. त्याच प्रमाणे मागील दोन वर्षांपूर्वी असलेल्या कार्यकारिणीला एक वर्षासाठी अजून कार्यकाळ वाढवून देण्यात आला. कारण कोरोना काळामध्ये या कार्यकारिणीला काम करता आले नव्हते. एक वर्षांसाठी मुदतवाढ दिलेली कार्यकारणी पुढील प्रमाणे.

श्रीवर्धन प्रेसक्लब अध्यक्ष, भारत हरिश्चंद्र चोगले, उपाध्यक्ष, सूर्यकांत पांढर कामे बोर्लिपंचतन, मंगेश निंबरे कारिवणे, सचिव, सावन तवसाळकर, खजिनदार, वैभव तोडणकर. तर सदस्य म्हणून रायगड प्रेस क्लबचे जिल्हा संघटक विजय गिरी, सल्लागार दत्तात्रय पांढरकामे, सदस्य, प्रसाद नाझरे, अभय पाटील, संजय मांजरेकर, संतोष शिलकर, संतोष रेळेकर, संतोष चौकर, खलील आराई, अबिद करदमे, आनंद जोशी. श्रीवर्धन प्रेस क्लबची नवीन कार्यकारिणी जाहीर झाल्यानंतर विविध मान्यवरांनी श्रीवर्धन प्रेस क्लबच्या कार्यकारिणीला व सदस्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# माणगांव पोलीस स्टेशन निरिक्षक पदी वाहतूक शाखेचे प्रभारी राजेंद्र पाटील यांची नियुक्ती

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव पोलीस स्टेशन चे वरिष्ठ पोलीस निरिक्षक अश्वनाथ खेडकर यांची बदली अलिबाग येथे प्रभारी अधिकारी जिल्हा वाहतुक शाखा रायगडला झाल्याने आता माणगांवचे पोलीस स्टेशनचा पदभार पूर्वी जिल्हा वाहतुक शाखेत प्रभारी अस-लेले पो. नि. राजेंद्र पांडुरंग पाटील यांनी स्विकारला आहे. त्यांची रायगडचे पोलीस अधिक्षक अशोक दुधे यांचे आदेशानुसार नव्याने नियुक्ती करण्यात आली आहे.



माणगांव मधिल आपल्या वर्षभराच्या सेवा काळात पो.नि. अश्वनाथ खेडकर यांनी माणगांव मध्ये शांतता व सुव्यवस्था राखली, जनतेशी सौजन्य पूर्ण पोलीस-मैत्रीचे नाते जपले होते. ट्राफिक तसेच गुन्हेगारी विशेष म्हणजे कोरोना संकट काळातील जवळपास अखेरच्या टप्प्यातील सर्व परिस्थिती काळजीपूर्वक हाताळणारे वरिष्ठ पो. नि. अश्वनाथ खेडकर यांचे प्रमाणेच पो. नि. राजेंद्र पाटील यांचे कडुनही माणगांवकरांना सहकार्याची अपेक्षा आहे.

आज पहिल्यांदाच माणगांव तालुका पत्रकार सेवा संघाचे पत्रकार सदस्यांनी पो. नि. राजेंद्र पाटील यांची भेट घेऊन पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन करीत माणगांव मध्ये मनःपूर्वक स्वागत केले. पाटील यांनीही पत्रकारांशी बोलताना माणगांवकरांकडुन सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. रायगड जिल्ह्यात येण्यापूर्वी पाटील हे दापोली, रत्नागिरी जिल्ह्यात कार्यरत होते. जेष्ठ नागरिक आणि महिलांसुरक्षा विषयक विशेष प्रयत्न करण्याचा त्यांनी मानस व्यक्त केला असुन आदिवासी समाजासाठी चांगले मदतकार्य करुन त्यांचे सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करुयात असेही त्यांनी विश्वासाने आपले मत व्यक्त केले.

# होममिनीस्टरने रंगला पेण भाजपचा हळदी-कुंकू कार्यक्रम

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुका महिला भाजप पक्षातर्फे भव्य हळदीकुंकु व होम मिनिस्टर कार्यक्रम गांधी मंदीरच्या पटांगणात संपन्न झाला. या स्पर्धेदरम्यान उपस्थित अनेक महिलांनी विविध क्रमांक पटकावित पैठणी जिंकल्या. यावेळी पेणचे आमदार रविशेठ पाटील, माजी जिप सदस्या कौसल्याताई पाटील व नगराध्यक्षा प्रितम पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

नगराध्यक्षा प्रितम ललित पाटील यांच्या संकल्पनेतून सदर हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हळदीकुंकू कार्यक्रमास हजारोंच्या संख्येने महिलांची उपस्थिती होती. उपस्थित महिलांना हळदीकुंकु, तीळगुळ, सौभाग्याचे वाण व ताटं भेट देण्यात आले.




सदर कार्यक्रमास भाजप आमदार रविशेठ पाटील, माजी जिप सदस्या कौसल्याताई पाटील, नगराध्यक्षा प्रितम ललित पाटील, सभापती वैशाली कडू, शेहनाज मुजावर, अश्विनी शहा, देवता साकोस्कर, सुषमा अनिरुद्ध पाटील, शर्मिला वैकुंठ पाटील, प्रतिभा प्रशांत पाटील, माजी नगरसेविका धनश्री समेळ, शहर अध्यक्षा सुप्रिया चव्हाण, तालुका अध्यक्षा तन्वी पाटील, अनुष्का पोटे, संचिता तेलवणे, प्रियंका झिंजे व भाजप महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

यावेळी झालेल्या होम मिनिस्टर कार्यक्रमात अनेक विजेत्या महिलांना पैठणी बक्षीस देण्यात आल्या. तर यावेळी आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते लकी ड्रॉ मधून उपस्थित १० महिलांनाही पैठणी बक्षीस देण्यात आल्या. उपस्थित महिलांना पेणच्या नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी मार्गदर्शन केले.

# राज्यपालांच्या हस्ते राजभवन येथे सहजसेवा फाऊंडेशनचा गौरव

### सहज निसर्ग शाळेचा राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्याकडून जागतिक उपक्रमाबद्दल सन्मानचिन्ह देऊन गौरव

**दै.रायगड नगरी । खोपोली**

सहजसेवा फाउंडेशन सामाजिक कार्यात अग्रेसर असते.सातत्यपूर्ण उपक्रम ही सहज-सेवेची ओळख आहे तर सामाजिक उपक्रमातुन नवनवीन जागतिक रेकॉर्ड ही संस्थेची उपलब्धी आहे.दिनांक १९ डिसेंबर २०२१ रोजी वीटभट्टी कामगारांच्या मुलांसाठी सुरू केलेली शाळा ही वंचित व उपेक्षित घटकांच्या मुलांसाठी वरदान ठरत आहे. झाडाखाली भरलेल्या शाळेला खऱ्या खुऱ्या शाळेचे रूप आलेले आहे. समाजातील अनेक दानशूर व्यक्ती व संस्था या शाळेसाठी भरीव योगदान देत आहेत.



२६ जानेवारी २०२२ रोजी वीटभट्टी कामगारांच्या सहज निसर्ग शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. टाटा स्टील लिमिटेडचे आस्थापण प्रमुख कपील मोदी व खालापूर तालुक्याचे गटविकास अधिकारी बालाजी पुरी यांच्या हस्ते तसेच विविध मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. या उपक्रमाची जागतिक उपक्रम म्हणून नोंद झालेली आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्या हस्ते दिनांक ०८ फेब्रुवारी २०२२ रोजी राजभवन, मुंबई येथे सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी राज्यपाल यांनी संस्थेच्या सहज अन्नसेवा, सहज मनोरुग्ण स्वच्छता, सहज स्वर्गरथ, सहज वैद्यकिय उपकरणे, सहज स्वर्गपेटी, सहज सामुदायिक विवाह, सहज आपत्कालीन मदत व विविध कार्याची माहिती घेऊन उपक्रमांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. यावेळी राजभवन येथे सहजसेवा फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. शेखर जांभळे, सहज निसर्ग शाळेत शिक्षकरुपात सातत्यपूर्ण योगदान देणाऱ्या उपाध्यक्षा इशिका शेलार, कार्यवाह बी. निरंजन, संघटक अखिलेश पाटील, जयश्री भागेकर यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी रसायनी येथील कराडे खुर्दचे माजी सरपंच विजय मुरकुटे,नवी मुंबई येथील नीरज पंत उपस्थित होते. या उपक्रमात व्हिजन फ्रेश यांनी सह आयोजकाची भूमिका बजावली आहे.

वंचित व उपेक्षित घटकांना सहजसेवा फाउंडेशन सातत्यपूर्ण सेवा देण्याचा प्रयत्न करीत असते. लोकसहभागातून उपक्रम राबविणाऱ्या संस्थेच्या मदत कार्यात भरीव योगदान देणाऱ्यांना हा पुरस्कार अर्पण केल्याची भावना संस्थेच्या कार्याध्यक्षा माधुरी गुजराथी यांनी व्यक्त केली आहे.

# श्रीवर्धनमध्ये आज ही शिवसेनेचा आवाज : अनिल नवगणे

**दै.रायगड नगरी । दिघी**

आठशे शिवसैनिक घेऊन मी राष्ट्रवादी पक्षात प्रवेश करणार ही घोषणा ऐकल्यावर मला प्रश्न पडला, जर खरोखरच एवढे कार्यकर्ते शिवसेना सोडून गेले तर तालुक्यात कार्यकर्ते राहतील किती? त्यासाठी सत्य परिस्थिती काय आहे हे बघण्यासाठी आज आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. परंतु, सभागृहात शिरल्यावर घोषणांनी सभागृह दुमदुमन गेल्याने श्रीवर्धन मध्ये आज ही शिवसेनेचा आवाज असे प्रतिपादन दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष अनिल नवगणे यांनी केलं.

शिवसेनेचे उपतालुकाप्रमुख सुकुमार तोंडलेकर व त्यांच्या सहकार्यांनी खासदार सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस मधे प्रवेश केल्यानंतर तालुक्यात शिवसेना संघटनेमधे पोकळी निर्माण झाली असुन काही दिवसात आणखीन शिवसैनिक राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये प्रवेश करतील अशी सभेत प्रतिक्रिया देणाऱ्या तोंडलेकर यांच्या घोषणेला उत्तर देण्यासाठी उपजिल्हाप्रमुख शाम भोकरे यांनी सोमवार दि.०७ फेब्रुवारी रोजी बोर्लीपंचतन येथील आगरी समाज सभागृह येथे आढावा बैठकीचे आयोजन केले होते.

जिल्हाप्रमुखांनी तोंडलेकर यांच्या राष्ट्रवादी पक्ष प्रवेशावर जोरदार टिका करताना बोलले की, जिल्हा परिषदेची उमेदवारी म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसमधे प्रवेश करणारे तोंडलेकर यांना व त्यांच्या बरोबर प्रवेश करणार्या सहकार्यांना सहा महिन्यात राष्ट्रवादी काँग्रेस काय पक्ष आहे ते समजेल. ज्या शिवसेना पक्षांकडून सगळी पद उपभोगलीत व आता महाविकास आघाडी सरकार असुन सुद्धा तालुक्यात विकासकामे होतं नाही. निधी येत नाही ही उपरती जिल्हा परिषद निवडणूक जवळ आल्यावरच का झाली.



यावेळी सुकुमार तोंडलेकर यांच्या बरोबर सामुहिक राजीनामा देण्याबाबत उपजिल्हाप्रमुख शाम भोकरे म्हणाले बोर्लीपंचतन शिवसेना गटाची झालेली सभा सुकुमारने आयोजित केली होती. सामुहिक राजीनामा नाट्यामागे याचा हेतू काय होता हे आता समजल. माझ्या मागे बोर्लीपंचतन येथील सर्व पदाधिकारी खंबीर उभे असल्याचे दाखवायच होत.

आगरी समाज येथे संपन्न झालेल्या आढावा बैठकीस माजी आमदार तुकाराम सुर्वे, उपतालुकाप्रमुख अरुण शिगवण, सभापती बाबुराव चोरगे, पंचायत समिती सदस्य मीना गाणेकर, श्रीवर्धन शहरप्रमुख राजेश चव्हाण, प्रितम श्रीवर्धनकर,जितेंद्र माळी, कुमार गाणेकर,जगन्नाथ चाळके तसेच शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.